
अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



आज

**श्री स्वामी समर्थ**

**प्रकट दिन**

श्री स्वामी समर्थांच्या
चरणी कोटी - कोटी प्रणाम ।



www.surajyadigital.com । शुक्रवार, दि.२० मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १७० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# कमरेला पिस्तुल....डोळ्यावर गॉगल...भाईचा आशीर्वाद...

# टेंभुर्णीत गँगवार



## पिस्तुलफेम भैयाचे अहिल्यानगर कनेक्शन

✔ टेंभुर्णी - सोलापूर/प्रतिनिधी

**गुन्हेगारी विश्वाच्या यादीत असलेल्या सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील बहुचर्चित टेंभुर्णी परिसरात गँगवर भडकण्याची चिन्हे दिसताहेत. तसा अंदाज खुद्द पोलिसांनी व्यक्त करतानाच, जिवंत काडतुसे आणि पिस्टलांच्या प्रदर्शनातून 'भाईगिरी' करणाऱ्यांना, मोठा अनर्थ घडण्यापूर्वी कायमची अद्दल घडवण्याचे आव्हान त्यांच्या पुढे आहे. दरम्यान पिस्तुल फेम अभिषेक ऊर्फ भैया गायकवाडला काल बुधवार (ता.१८) रोजी जिवंत काडतुसे आणि पिस्तुलसह गुन्हे विभागाच्या पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याचे अहिल्यानगर येथील कुख्यात गुंड निलेश घायवळ व सागर मोहोळकरशी 'कनेक्शन' असल्याची माहिती पोलिसांच्या हाती लागली आहे.**

माढा तालुक्यातील टेंभुर्णीपासून जवळच असलेल्या बेंबळे गावातील २८ वर्षीय युवकाकडे देशी बनावटीचे पिस्टल असल्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचा पथकाने लावला. अभिषेक उर्फ भैय्या गायकवाड (वय २८ रा.बेबळे) याला याप्रकरणी ताब्यात घेऊन त्याच्याकडून पिस्तुलसह जिवंत काडतुसे जप्त केली. विशेषत्वे, त्याचे कनेक्शन निलेश घायवळ व नुकताच खून झालेल्या सागर मोहोळकर यांचेशी असल्याचे उघड झाले आहे. तर या कारवाईमुळे भविष्यात टेंभुर्णी परिसरात घडणारी फायरिंगची घटना टळल्याचे मानले जात आहे. बनावट पिस्टल व जीवंत काडतूस जप्त करीत गायकवाडला अटक करण्यात आली आहे.विशेष म्हणजे या प्रकरणाचे धागेदोरे थेट जामखेड येथील मृत आरोपीपर्यंत पोहच असल्याने टेंभुर्णीतील वाढत्या गुन्हेगारीबाबत मोठा इशारा मिळत आहे.

तीन महिन्यांत तिसरे बेकायदा गावठी पिस्टल सापडल्याने टेंभूर्णी शहर परिसरात खळबळ माजली असून पिस्तूल फेम भाईगिरीच्या प्रदर्शनाने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. भविष्यात या शहरात फायरिंग गुन्हेगारीच्या घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याशिवाय आणखी पिस्तुल फेम यांना ताब्यात घेण्याची गरज आहे.

(अधिक वृत्त पान ७ वर...)

### अभिषेकने रील शेअर केल्या, कारवाईसाठी पोलीस होतो मागावर

निलेश घायवळ व सागर मोहोळकर यांच्या संदर्भातील संशयित आरोपी अभिषेक गायकवाड याने सोशल मीडियावर रिल शेअर केल्या होत्या.यावरून गुन्हे शाखेचे पोलीस त्यांचे मागावर होते. अखेर त्याचा करेक्ट कार्यक्रम केला.

### गायकवाड अन् टेंभूर्णीतील युवकांमध्ये पिस्तूल देण्या-घेण्याबाबत चॅटींग...

अभिषेक गायकवाड याच्याशी त्याचा मित्राने 'मला पिस्तूल दे, मला चापट मारणाऱ्याचा काटा काढायचा आहे, यासाठी मला पिस्तूल हवी आहे' अशी मागणी केल्याचे चॅटींग केलेले पुरावे स्थानिक शाखेने टेंभुर्णी पोलीस ठाण्याकडे सादर केले असून त्या चॅटींग करणाऱ्या युवकावर कारवाई होणार का? याकडे टेंभुर्णीकरांचे लक्ष लागले आहे.

### बेकायदेशीर हत्यारांची सहज उपलब्धता आणि त्यामागील संघटित गुन्हेगारीचे संकेत

गावठी पिस्टल प्रकरणाच्या संपूर्ण घटनेमुळे टेंभुर्णी शहरात बेकायदेशीर हत्यारांची सहज उपलब्धता आणि त्यामागील संघटित गुन्हेगारीचे संकेत समोर येत आहेत. पुणे व नगरप्रमाणेच टेंभुर्णीतही गुन्हेगारी टोळ्यांचे जाळे विस्तारत असल्याचे चित्र निर्माण झाले असून, येत्या काळात मोठ्या प्रमाणात गँगवॉर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने वेळीच कठोर पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### कुख्यात गुंड सागर मोहोळकरचे टेंभुर्णी कनेक्शन...



गावठी पिस्टल प्रकरणाला अधिक गंभीर बनवणारी बाब म्हणजे आरोपी सागर मोहोळकर याच्यावर ४ मार्च रोजी जामखेड शहरात गोळीबार झाला होता आणि उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे आणि सागर मोहोळकर यांचे कनेक्शन थेट टेंभुर्णीपर्यंत असल्याने टेंभुर्णी शहर व परिसरामध्ये गुन्हेगारीचे मोठे जाळे पसरलेले दिसून येत आहे.



टेंभुर्णी : अटक केलेला गावठी पिस्टल बाळगणाऱ्या अभिषेक गायकवाडसह पोलीस अधिकारी.

### मामाकडे जाणे-येणे अन् मोहोळकरकडून पिस्तुलची खरेदी

अभिषेक गायकवाड हा खर्डा (ता. जामखेड) येथील त्यांच्या मामाकडे जात होता. या टप्यावर नुकतीच मागील दहा दिवसांपूर्वी खून झालेल्या व कुख्यात डॉन निलेश घायवळ याला चापट मारणारा सागर मोहोळकर याच्याशी त्याची मैत्री होती. मृत सागर मोहोळकर यांचेकडून ५० हजार रुपये देऊन सदर पिस्टल खरेदी केली होती.

### गुन्हेगारी क्षेत्राकडे वळणाऱ्या युवकांना आवर घालण्याचे आव्हान

टेंभूर्णी परिसरात मागील तीन महिन्यांपूर्वी दोघांकडे गावठी पिस्तूल सापडले होते. बुधवारी गायकवाड यांचेकडे ही सापडले असून आणखी अशा किती बेकायदेशीर पिस्टल आहेत, याचा शोध घेऊन गुन्हेगारी क्षेत्राकडे वळणाऱ्या युवकांना वाचवण्याचे आव्हान टेंभुर्णी पोलिसांसह त्यांच्या पालकांपुढे आहे.

### मोडनिंबच्या कला केंद्रात झाला होता थरार

टेंभुर्णीसह परिसरातील मोडनिंब वगैरे भागात बेकायदा पिस्तल बाळगणाऱ्यांची संख्या मोठी असल्याची वस्तुस्थिती असल्याचे सांगितले जात आहे. काही महिन्यांपूर्वी मोडनिंबच्या लोकनाट्य संगितबारी केंद्रात फायरिंग करण्याचा थरार घडला होता. ते पिस्तुलदेखील बनावटरित्याच बाळगलेले होते, असा संदर्भदेखील गायकवाड याच्याकडील पिस्तुल ताब्यात घेतल्यानंतर दिला जात आहे.

---

## 'तारीख पे तारीख' प्रकाराला आळा घालण्यासाठी नवे नियम

- 'सर्वोच्च' ऐतिहासिक निर्णय
- कोर्टाच्या तारखांनी होणार नाही यापुढे त्रास
- सुनावणी पुढे ढकलण्यसाठी द्यावा लागणार सक्षम पुरावा

✔ दिल्ली



'शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये', असे म्हणतात. याचे कारण म्हणजे वर्षानुवर्षे चालणारे खटले, त्यासाठी सतत घालावे लागणारे खेटे आणि आर्थिक नुकसान. कोर्टाच्या तारखांमुळे लोक हैराण होतात. पण यापुढे हे चित्र बदलणार आहे. सुप्रीम कोर्टाने तारीख पे तारीख'ला आळा घालण्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यामुळे एका प्रकरणासाठी सातत्याने कोर्टाची पायरी चढावी लागणार नाही.

सुप्रीम कोर्टाने बुधवार (ता.१८) याबाबतचे एक परिपत्रक जाहीर केले असून एखाद्या प्रकरणाची सुनावणी टाळण्यासाठी किंवा

(अधिक वृत्त पान ७ वर...)

### केवळ अपरिहार्य कारणास्तव मिळणार पुढची तारीख...

केवळ अपरिहार्य कारणास्तव पुढची तारीख मिळू शकते किंवा सुनावणी पुढे ढकलली जाऊ शकते. कुटुंबामध्ये एखाद्या व्यक्तीचा मृत्यू, गंभीर आजार किंवा इतर ठोस कारणे, जे कोर्टासमोर टिकू शकेल, अशा परिस्थितीच पुढची तारीख दिली जाईल. नव्या प्रकरणांमध्ये सुरूवातीला केवळ एकदाच पुढच्या तारखेसाठी अर्ज देता येईल. सलग दोनदा सुनावणी पुढे ढकलता येणार नाही. या अर्जाचा नमूनाही तयार करण्यात आला असून हा अर्ज भरून ईमेलवर पाठवावा लागेल.

## शिक्षण संस्थाचालकाची पलूसमध्ये हत्या

✔ सांगली/प्रतिनिधी

या जिल्ह्यातील पलुस शहरात बुधवारी रात्री एका ज्येष्ठ शिक्षण संस्था संचालकाचा त्याच्याच घराजवळ निर्घृण खून झाल्याच्या घटनेने संपूर्ण सांगली जिल्हा हादरला. पंडित विष्णू दिगंबर शिक्षण संस्थेचे विद्यमान संचालक संजय प्रभाकर परांजपे यांची अज्ञातांनी धारदार शस्त्राने वार करून हत्या केली.

परांजपे हे पलूसमधील कुंडल वेस भागातील एका अपार्टमेंटमध्ये आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होते. ही घटना रात्रीच्या सुमारास घडली असून, हल्लेखोरांनी अतिशय क्रूरपणे त्यांच्यावर वार केले आणि घटनास्थळावरून पळ काढला. या घटनेची माहिती मिळताच पलूस पोलिसांनी तातडीने धाव घेत तपासचक्र फिरवण्यास सुरुवात केली आहे.

## माजी मंत्री सावंतांचे पुतणे धनजयं थोडक्यात बचावले

# कंटेनरसोबतच्या भीषण अपघातात फॉर्च्युनर चेंदामेंदा


- भाजप प्रवेशाचा सोहळा उरकून निघाले होते धाराशिवला
- भिगवणजवळील डाळज गावाजवळ मध्यरात्री अपघात

✔ भिगवण/प्रतिनिधी

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर बारामतीजवळ एक भीषण अपघाताची घटना घडलीय. गुरुवार (ता.१९) मध्यरात्रीनंतर झालेल्या या अपघातात माजी मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे धनंजय सावंत यांच्या फॉर्च्युनर कारला भरधाव कंटेनरने धडक दिली आहे. भाजपमधील पक्षप्रवेश केल्यानंतर धाराशिवला घरी परतताना धनंजय सावंत हा अपघात घडला. मात्र या भीषण अपघातातून माजी जि.प. उपाध्यक्ष धनंजय सावंत हे थोडक्यात बचावले आहे. मात्र या अपघातात फॉर्च्युनर अक्षरशः चेंदामेंदा झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धनंजय सावंत हे आपल्या काही सहकाऱ्यांसोबत फॉर्च्युनर कारमधून धाराशिवकडे जात होते. मध्यरात्री उशिरा बारामतीपासून जवळच असलेल्या भिगवणजवळ त्यांच्या कारला भीषण अपघात झाला. त्यांच्या कारला भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली आहे. यात कारचं मोठं नुकसान झालं आहे. भाजप प्रवेशावरून परतताना धनंजय सावंत यांच्या गाडीला

(अधिक वृत्त पान ७ वर...)



भिगवण : अपघातात फॉर्च्युनरची झालेली अवस्था.

### धनंजय सावंत यांचा कुटुंब आणि कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश

शिवसेना आमदार तानाजी सावंत यांचे धनंजय सावंत हे पुतणे आहेत. नुकत्याच त्यांनी सहकुटुंब भाजपमध्ये प्रवेश केलाय. जिल्हा परिषद निवडणूक अपक्ष लढलेले धनंजय सावंत यांनी कुटुंब आणि कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला आहे. धाराशिवमध्ये शिंदेंच्या शिवसेनेला खिंडार पडल्याचं बोललं जात असून धनंजय सावंत यांचा कार्यकर्त्यांसह शिवसेनेला अखेरचा 'जय महाराष्ट्र' केलाय. मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजप आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या उपस्थितीत हा भाजप प्रवेश सोहळा पार पडला. धनंजय सावंत यांनी त्यांच्या पत्नी आणि मुलासह सहकुटुंब भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला. जिल्हा परिषद निवडणूक भाजपच्या पाठिंबावर अपक्ष निवडून आल्यानंतर आता थेट भाजपमध्ये सावंत दाखल झाले आहे.

सोलापूर शहराचे

**तापमान**



कमाल तापमान

**३६.४**

### तिसरा डोळा

- प्रकाश पोरे



आदिला !

# राज्यातल्या काँग्रेसला लवकरच मिळणार बूस्टर

## विद्यमान अध्यक्षांची होणार उचलबांगडी : नव्या चेहऱ्यांसाठी टाकणार रेड कार्पेट

✔ सोलापूर/प्रतिनिधी

देशावर एकेकाळी मनसोक्त सत्ता गाजवलेली काँग्रेस आज देशभरात कमकुवत झाली आहे. या काँग्रेसला नवी संजीवनी कशी द्यायची हीच चिंता अ.भा. काँग्रेस महासमितीला लागून आहे. अशा स्थितीतही पक्षाला उभारी देण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या दिल्लीश्वरांनी चालवला आहे. काँग्रेसची खिळखिळी झालेली खुंटी पुन्हा मजबूत करण्यासाठी काँग्रेसने महाराष्ट्रात सृजन अभियान राबवण्याचा निर्धार केला आहे. त्यामधून राज्यातील सर्व जिल्हा आणि शहर काँग्रेसचे विद्यमान अध्यक्ष बदलून त्यांच्याजागी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे.

अखिल भारतीय काँग्रेसने देशभरातील अर्ध्याहून जास्त राज्यांतील शहर व जिल्ह्यात संघटनात्मक फेरबदल केल्यानंतर आता महाराष्ट्रातही संघटन सृजन अभियान राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत राज्यातील सर्वच शहर व जिल्हा काँग्रेस अध्यक्षांची नव्याने नियुक्ती केली जाणार आहे. यासाठी अ. भा. काँग्रेसने ३७ निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. संबंधित निरीक्षक काँग्रेसचे स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांपासून ते काँग्रेस विचारांच्या लोकांची मते घेऊन शहर व जिल्हाध्यक्षसाठी पॅनल तयार करून अ.भा. काँग्रेसकडे पाठविणार आहे. अ. भा. काँग्रेसने छत्तीसगड,

(अधिक वृत्त पान ७ वर...)



### निरीक्षक नेमके काय करतील

अ. भा. काँग्रेसने नेमलेले निरीक्षक संबंधित जिल्ह्यातील काँग्रेस नेते, विधानसभा, ब्लॉक स्तरावरील पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, एनजीओ, सिव्हिल सोसायटी, व्यावयासिक संघटना, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, काँग्रेस हितेशी यांच्या भेटी घेऊन त्यांची मते जाणून घेतील. निरीक्षकांना किमान सात दिवस मुक्कामी असणे बंधनकारक आहे. दररोजच्या भेटीचा अहवाल अ.भा. काँग्रेककडे सादर करावा लागेल. या चर्चेतून येणाऱ्या इनपूटच्या आधारे शहर व जिल्हाध्यक्ष पदासाठी जास्तीत जास्त सहाजणांचे पॅनल तयार करून अ. भा. काँग्रेसकडे पाठविले जाईल. निरीक्षक नावे पाठविताना प्राधान्यक्रम देऊ शकतात. नेत्यांचा कल, लिंग, जात, विभागीय समतोल, सामाजिक समीकरण आदी बाबी विचारात घेऊन हा क्रम ठरविला जाईल. निरीक्षकाने पाठविलेले पॅनल व अहवालाच्या आधारावर अ. भा. काँग्रेसकडून शहर व जिल्हाध्यक्षांची घोषणा केली जाईल.

कल्याण
589-25-177

मुंबई
455-43-256

1 6 0